30 OCT 2024

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाचा भारतीय वायू दलासमवेत सामंजस्य करार

## अधिकारी, जवानांना उच्चशिक्षण घेण्याची संधी मिळणार

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

भारतीय वायू दलाच्या (इंडियन एअर फोर्स) जवानांना सेवेवर कार्यरत असताना उच्च शिक्षण पूर्ण करण्याची संधी शिवाजी विद्यापीठासमवेत झालेल्या सामंजस्य कराराद्वारे प्राप्त होणार आहे. ही अतिशय मौलिक बाब असल्याचे मत भारतीय वायू सेनेचे एअर व्हाईस मार्शल राजीव शर्मा यांनी व्यक्त केले.

भारतीय वायू सेना व शिवाजी विद्यापीठ यांच्यामध्ये महत्त्वपूर्ण सामंजस्य करार झाला. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, वायू सेनेच्या ग्रुप कॅप्टन रचना जोशी, विंग कमांडर विनायक गोडबोले, विंग कमांडर बी. एम. जोसेफ प्रमुख उपस्थित होते. एअर व्हाईस मार्शल शर्मा म्हणाले, सामंजस्य करार वायू सेनेच्या समग्र परिवाराचे शैक्षणिक उत्थान साधणारा आहे. देशातील विद्यापीठे, शैक्षणिक संस्थांसमवेत वायू दलाने करार केले. त्यात शिवाजी विद्यापीठासह तीन संस्थांचा समावेश आहे.

अध्यक्षीय मनोगतात कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, शिवाजी विद्यापीठाचा भारतातील सैन्यदलासमवेत होणारा पहिलाच सामंजस्य करार आहे. भारतीय वायू दलातील अग्निवीर जवानांना उर्वरित शिक्षण पूर्ण करण्यासाठी विद्यापीठ मदत करेल. वायू दलाने त्यांच्या शैक्षणिक गरजा कळविल्यास त्यास अनुसरून अभ्यासक्रमही निर्माण करता येतील.

सामंजस्य करारावर कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी, तर भारतीय वायू दलातर्फे एअर व्हाईस मार्शल शर्मा यांनी स्वाक्षरी केल्या. इनोव्हेशन, इनक्युबेशन व लिंकेजेस केंद्राचे संचालक डॉ. सागर डेळेकर यांनी स्वागत केले. इंग्रजी अधिविभाग प्रमुख डॉ. प्रभंजन माने यांनी प्रास्ताविक केले. कुलसचिव डॉ. शिंदे यांनी आभार मानले. यावेळी मानव्यशास्त्र विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, इंग्रजी अधिविभागातील डॉ. अक्षय सरवदे, डॉ. चंद्रकांत लंगरे, डॉ. राजश्री बारवेकर, डॉ. एम. एस. वासवानी आदी उपस्थित होते.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाने भारतीय वायू दलासमवेत सामंजस्य करार केला. याप्रसंगी कराराच्या प्रतींचे हस्तांतरण करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, एअर व्हाईस मार्शल राजीव शर्मा. सोबत विंग कमांडर बी. एम. जोसेफ, विंग कमांडर विनायक गोडबोले, ग्रुप कॅप्टन रचना शर्मा, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे आदी. (छाया : नाज ट्रेनर)**

30 OCT 2024
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाचा भारतीय वायू दलासमवेत सामंजस्य करार

## अधिकारी, जवानांना उच्चशिक्षण घेण्याची संधी मिळणार : मातृसंस्थेचे ऋण फेडण्याचा प्रयत्न : विंग कमांडर गोडबोले

प्रतिनिधी
कोल्हापूर

भारतीय वायू दलाच्या (इंडियन एअर फोर्स) जवानांना सेवेवर कार्यरत असतानाही आपले उच्च शिक्षण पूर्ण करण्याची संधी शिवाजी विद्यापीठासमवेत झालेल्या सामंजस्य कराराद्वारे प्राप्त होणार आहे. ही अतिशय मौलिक बाब असल्याचे मत भारतीय वायू सेनेचे एअर व्हाईस मार्शल राजीव शर्मा यांनी आज येथे व्यक्त केले.

भारतीय वायू सेना आणि शिवाजी विद्यापीठ यांच्यामध्ये आज एक अत्यंत महत्त्वपूर्ण सामंजस्य करार करण्यात आला. त्यावेळी प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. तर, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्यासह वायू सेनेच्या ग्रुप कॅप्टन रचना जोशी, विंग कमांडर विनायक गोडबोले, विंग कमांडर बी.एम. जोसेफ प्रमुख उपस्थित होते.

एअर व्हाईस मार्शल शर्मा म्हणाले, वायू सेनेच्या समग्र परिवाराचे शैक्षणिक उत्थान साधणारा हा करार आहे. देशातील अवघी



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाने भारतीय वायू दलासमवेत सामंजस्य करार केला. यप्रसंगी कराराच्या प्रतींचे हस्तांतरण करताना कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, एअर व्हाईस मार्शल राजीव शर्मा, सोबत विंग कमांडर बी. एम. जोसेफ, डॉ. महादेव देशमुख, विनायक गोडबोले, रचना शर्मा, डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. सागर डेळेकर, डॉ. प्रभंजन माने, डॉ. राजश्री बारवेकर आदी.

२१ विद्यापीठे, शैक्षणिक संस्थांसमवेत वायू दलाने करार केले. त्यात शिवाजी विद्यापीठासह तीन संस्थांचा समावेश आहे.

दहावी, बारावीनंतर सैन्यदलात भरती होणारे जवान, अग्नीवीर यांना त्यांचे पदवीचे शिक्षण घेता येईल, अधिकाऱ्यांना त्यांचे उच्चशिक्षण घेता येईल. कुलगुरु डॉ. शिर्के म्हणाले, भारतीय वायू दलातील अग्नीवीर, जवानांना उर्वरित शिक्षण पूर्ण करण्यासाठी विद्यापीठ मदत करेलच. त्यापुढे जाऊन वायू दलाने त्यांच्या शैक्षणिक गरजा कळविल्यास त्यास अनुसरून अभ्यासक्रमही निर्माण करता येतील.

काही अभ्यासक्रम हे ऑनलाईन व ऑफलाईन अशा हायब्रीड स्वरुपात राबविण्यात येऊ शकतील. त्याखेरीज आवश्यकतेनुसार अल्प कालावधीच्या काही कार्यशाळाही आयोजित करता येतील.

प्र-कुलगुरु डॉ. पाटील म्हणाले, शिवाजी विद्यापीठाचे डीआरडीओ, डीआरडीई, डीएई, बीआरएनएस, बीएआरसी, आयआयजी, इस्रो इत्यादी विविध संरक्षण संस्थांशी संशोधकीय बंध प्रस्थापित झाले. अवकाश विज्ञान, हवामान शास्त्र, जिओ-इन्फॉर्मेटिक्स इत्यादी क्षेत्रांत विद्यापीठ मोठ्या प्रमाणात संशोधन करीत असल्याचेही त्यांनी सांगितले.

सामंजस्य करारावर विद्यापीठाच्या वतीने कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी, तर भारतीय वायू दलाच्या वतीने एअर व्हाईस मार्शल शर्मा यांनी स्वाक्षरी केल्या. डॉ. सागर डेळेकर यांनी स्वागत केले. इंग्रजी अधिविभाग प्रमुख डॉ. प्रभंजन माने यांनी प्रास्ताविक केले. विंग कमांडर विनायक गोडबोले विद्यापीठाच्या इंग्रजी अधिविभागाचे २१ वर्षांपूर्वीचे माजी विद्यार्थी आहेत. भारतीय वायू दलासमवेत आजचा सामंजस्य करार होण्यामध्ये त्यांची भूमिका महत्वाची ठरली.

मातृसंस्थेचे ऋण काहीअंशी फेडण्याचा आपला हा प्रयत्न असून, हा क्षण आपल्यासाठी अत्यंत भावनिक स्वरुपाचा असल्याचे गोडबोले यांनी सांगितले. यावेळी डॉ. महादेव देशमुख, डॉ. अक्षय सरवदे, डॉ. चंद्रकांत लंगरे, डॉ. राजश्री बारवेकर, डॉ. एम. एस. वासवानी आदी उपस्थित होते.

30 OCT 2024

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर येथे शिवाजी विद्यापीठाने भारतीय वायुदलासमवेत मंगळवारी सामंजस्य करार केला. याप्रसंगी कराराच्या प्रतींचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि एअर व्हाईस मार्शल राजीव शर्मा यांनी हस्तांतरण केले. यावेळी बी. एम. जोसेफ, डॉ. महादेव देशमुख, विनायक गोडबोले यांच्यासह अधिकारी उपस्थित होते.

# विद्यापीठात अधिकारी, जवानांना उच्चशिक्षण घेण्याची संधी

## विद्यापीठाचा भारतीय वायू दलासमवेत सामंजस्य करार

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** भारतीय वायुदलाच्या (इंडियन एअर फोर्स) जवानांना सेवेवर कार्यरत असतानाही आपले उच्च शिक्षण पूर्ण करण्याची संधी शिवाजी विद्यापीठासमवेत झालेल्या सामंजस्य कराराद्वारे प्राप्त होणार आहे, ही अतिशय मौलिक बाब असल्याचे मत भारतीय वायुसेनेचे एअर व्हाईस मार्शल राजीव शर्मा यांनी मंगळवारी व्यक्त केले.

भारतीय वायुसेना आणि शिवाजी विद्यापीठ यांच्यामध्ये सामंजस्य करार करण्यात आला. त्यावेळी प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद सभागृहात झालेल्या या कार्यक्रमात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते. तर, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्यासह वायुसेनेच्या ग्रुप कॅप्टन रचना जोशी, विंग कमांडर विनायक गोडबोले, विंग कमांडर बी. एम. जोसेफ उपस्थित होते. शर्मा म्हणाले, दहावी, बारावीनंतर सैन्यदलात भरती होणारे जवान, अग्निवीर यांना त्यांचे पदवीचे शिक्षण घेता येईल, अधिकाऱ्यांना त्यांचे उच्च शिक्षण घेता येईल किंवा आवश्यक कौशल्याचे ज्ञान संपादन करता येईल. कुलसचिव डॉ. विलास शिंदे व एअर व्हाइस मार्शल शर्मा यांनी करारावर स्वाक्षऱ्या केल्या. डॉ. सागर डेळेकर यांनी स्वागत केले. डॉ. प्रभंजन माने यांनी प्रास्ताविक केले.

### काय आहे सामंजस्य करार

या सामंजस्य करारान्वये, भारतीय वायुदलातील पात्र जवानांना शिवाजी विद्यापीठाच्या ऑनलाइन व दूरस्थ शिक्षण केंद्राच्या माध्यमातून प्रमाणपत्र, पदवी, पदव्युत्तर शिक्षण घेता येईल. त्यांना या दलाच्या शिफारशीनुसार काही सवलतीही प्रदान केल्या जातील. वायुदलाच्या अधिकाऱ्यांना पदव्युत्तर शिक्षणासाठी काही जागा विद्यापीठात राखीव ठेवण्यात येतील.

30 OCT 2024

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाचा वायुदलाशी सामंजस्य करार

## वायुदलातील अधिकारी, जवानांना मिळणार उच्चशिक्षण घेण्याची संधी

■ सकाळ वृत्तसेवा



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ आणि भारतीय वायुदलासमवेतच्या सामंजस्य कराराच्या प्रतींचे हस्तांतरण कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि एअर व्हाईस मार्शल राजीव शर्मा यांनी केले. यावेळी डावीकडून विंग कमांडर बी. एम. जोसेफ, डॉ. महादेव देशमुख, विंग कमांडर विनायक गोडबोले, ग्रुप कॅप्टन रचना शर्मा, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, सागर डेळेकर, प्रभंजन माने, राजश्री बारवेकर आदी उपस्थित होते.

कोल्हापूर, ता. २९ : 'भारतीय वायुदलाच्या (इंडियन एअर फोर्स) जवानांना सेवेवर कार्यरत असताना उच्चशिक्षण पूर्ण करण्याची संधी शिवाजी विद्यापीठासमवेत झालेल्या सामंजस्य कराराद्वारे प्राप्त होणार आहे. ही अतिशय मौलिक बाब असल्याचे मत भारतीय वायुसेनेचे एअर व्हाईस मार्शल राजीव शर्मा यांनी आज येथे व्यक्त केले.

भारतीय वायुसेना आणि शिवाजी विद्यापीठ यांच्यामध्ये सामंजस्य करार करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद सभागृहातील या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, तर प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, वायुसेनेच्या ग्रुप कॅप्टन रचना जोशी, विंग कमांडर विनायक गोडबोले, बी. एम. जोसेफ प्रमुख उपस्थित होते.

एअर व्हाईस मार्शल शर्मा म्हणाले, 'छत्रपती शिवाजी महाराज हे एक महान योद्धे होते आणि त्यांचे नाव धारण करणाऱ्या विद्यापीठासमवेत सामंजस्य करार करीत असताना भारतीय वायुसेनेला अत्यंत आनंद होत आहे. देशातील अवघी २१ विद्यापीठे, शैक्षणिक संस्थांसमवेत वायुदलाने करार केले, त्यात शिवाजी विद्यापीठासह तीन संस्थांचा समावेश आहे. दहावी, बारावीनंतर सैन्यदलात भरती होणारे जवान, अग्निवीर यांना त्यांचे पदवीचे तर अधिकाऱ्यांना त्यांचे उच्चशिक्षण घेता येईल.'

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, 'विद्यापीठाचा भारतातील सैन्यदलासमवेत होणारा असा हा पहिलाच सामंजस्य करार आहे. अग्निवीर, जवानांना उर्वरित शिक्षण पूर्ण करण्यासाठी विद्यापीठ मदत करेल. वायुदलाने त्यांच्या शैक्षणिक गरजा कळविल्यास त्यास अनुसरून अभ्यासक्रमही निर्माण करता येतील.'

या करारावर कुलसचिव डॉ. विलास शिंदे, एअर व्हाईस मार्शल शर्मा यांनी स्वाक्षरी केल्या. डॉ. सागर डेळेकर यांनी स्वागत केले. डॉ. प्रभंजन माने यांनी प्रास्ताविक केले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डॉ. महादेव देशमुख, अक्षय सरवदे, चंद्रकांत लंगरे आदी उपस्थित होते.

**सामंजस्य करार असा...**

या सामंजस्य करारान्वये भारतीय वायुदलातील पात्र जवानांना शिवाजी विद्यापीठाच्या ऑनलाईन व दूरस्थ शिक्षण केंद्राच्या माध्यमातून प्रमाणपत्र, पदवी, पदव्युत्तर शिक्षण घेता येईल, तर अधिकाऱ्यांना पदव्युत्तर शिक्षणासाठी काही जागा राखीव ठेवण्यात येतील. सैन्यदलात कार्यरत, निवृत्त अथवा शहीद जवान, अधिकाऱ्यांच्या मुलांनाही शिक्षणासाठी काही सवलती देण्यात येतील.

### भावनिक स्वरूपाचा क्षण

■ **विंग कमांडर विनायक गोडबोले हे विद्यापीठाच्या इंग्रजी अधिविभागाचे माजी विद्यार्थी आहेत. वायुदलासमवेत सामंजस्य करार होण्यामध्ये त्यांची भूमिका महत्त्वाची ठरली. मातृसंस्थेचे ऋण काहीअंशी फेडण्याचा आपला हा प्रयत्न असून, हा क्षण आपल्यासाठी अत्यंत भावनिक स्वरूपाचा असल्याचे गोडबोले यांनी सांगितले.**

# विद्यापीठाचा भारतीय वायू दलासमवेत सामंजस्य करार

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

भारतीय वायू दलाच्या (इंडियन एअर फोर्स) जवानांना सेवेवर कार्यरत असतानाही आपले उच्च शिक्षण पूर्ण करण्याची संधी शिवाजी विद्यापीठासमवेत झालेल्या सामंजस्य कराराद्वारे प्राप्त होणार आहे, ही अतिशय मौलिक बाब असल्याचे मत भारतीय वायू सेनेचे एअर व्हाईस मार्शल राजीव शर्मा यांनी आज येथे व्यक्त केले.

भारतीय वायू सेना आणि शिवाजी विद्यापीठ यांच्यामध्ये आज एक अत्यंत महत्त्वपूर्ण सामंजस्य करार करण्यात आला. त्यावेळी प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के होते. तर, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्यासह वायू सेनेच्या ग्रुप कॅप्टन रचना जोशी, विंग कमांडर विनायक गोडबोले, विंग कमांडर बी. एम. जोसेफ प्रमुख उपस्थित होते.

यावेळी शर्मा म्हणाले, या सामंजस्य कराराकडे मी केवळ अधिकारी आणि जवान यांच्याच कल्याणासाठीचा म्हणून पाहात नसून वायू सेनेच्या समग्र परिवाराचे शैक्षणिक उत्थान साधणारा हा करार आहे. देशातील अवघी २१ विद्यापीठे, शैक्षणिक संस्थांसमवेत वायू दलाने करार केले त्यात शिवाजी विद्यापीठासह तीन संस्थांचा समावेश आहे. दहावी, बारावीनंतर सैन्यदलात भरती होणारे जवान, अग्नीवीर यांना त्यांचे पदवीचे शिक्षण घेता येईल, अधिकाऱ्यांना त्यांचे उच्चशिक्षण घेता येईल किंवा आवश्यक कौशल्याचे ज्ञान संपादन करता येईल, तसेच त्यांच्या परिवारातील मुलांनाही शिक्षण घेता येईल. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांनी शिवाजी विद्यापीठाचे डीआरडीओ, डीआरडीई, डीएई, बीआरएनएस, बीएआरसी, आयआयजी, इस्रो इत्यादी विविध संरक्षण संस्थांशी संशोधकीय बंध प्रस्थापित झाले असल्याची माहिती दिली.

अध्यक्षीय मनोगतात कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, शिवाजी विद्यापीठाचा भारतातील सैन्य दलासमवेत होणारा असा हा पहिलाच सामंजस्य करार असल्याने तो ऐतिहासिक महत्त्वाचा असल्याचे सांगितले. ते म्हणाले, भारतीय वायू दलातील अग्नीवीर, जवानांना उर्वरित शिक्षण पूर्ण करण्यासाठी विद्यापीठ मदत करेलच. पण, त्यापुढे जाऊन वायू दलाने त्यांच्या शैक्षणिक गरजा कळविल्यास त्यास अनुसरून अभ्यासक्रमही निर्माण करता येतील. यावेळी सामंजस्य करारावर विद्यापीठाच्या वतीने कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी, तर भारतीय वायू दलाच्या वतीने एअर व्हाईस मार्शल शर्मा यांनी स्वाक्षरी केल्या. डॉ. सागर डेळेकर यांनी स्वागत केले. डॉ. प्रभंजन माने यांनी प्रास्ताविक केले, तर कुलसचिव डॉ. शिंदे यांनी आभार मानले.

या सामंजस्य करार प्रसंगी मानव्यशास्त्र विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, इंग्रजी अधिविभागातील डॉ. अक्षय सरवदे, डॉ. चंद्रकांत लंगरे, डॉ. राजश्री बारवेकर, डॉ. एम.एस. वासवानी आदी उपस्थित होते.

सामंजस्य कराराविषयी थोडक्यात :

या सामंजस्य करारान्वये, भारतीय वायू दलातील पात्र जवानांना शिवाजी विद्यापीठाच्या ऑनलाईन व दूरस्थ शिक्षण केंद्राच्या माध्यमातून प्रमाणपत्र, पदवी, पदव्युत्तर शिक्षण घेता येईल. त्यांना दलाच्या शिफारशीनुसार काही सवलतीही प्रदान केल्या जातील. वायू दलाच्या अधिकाऱ्यांना पदव्युत्तर शिक्षणासाठी काही जागा विद्यापीठात राखीव ठेवण्यात येतील. त्याचप्रमाणे इच्छुक अधिकाऱ्यांना यूजीसी निकष पूर्ततेच्या अधीन पीएच.डी.साठीही प्रवेश देण्यात येईल. याखेरीज, सैन्यदलात कार्यरत, निवृत्त अथवा शहीद जवान, अधिकारी यांच्या मुलांनाही शिक्षणासाठी काही सवलती देण्यात येतील.

30 OCT 2024
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# भारतीय ज्ञान प्रणाली विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याची गरज

## डॉ. पी. एस. पाटील

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये भारतीय ज्ञान प्रणालीचा समावेश केला असल्याने ती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविणे महत्वाचे आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्रकुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्यावतीने आयोजित भारतीय ज्ञान प्रणाली एकदिवसीय कार्यशाळेत ते बोलत होते. जिल्ह्यातील कला, वाणिज्य व शास्त्र विद्याशाखांसाठी या कार्यशाळेचे आयोजन केले होते.

डॉ. पाटील म्हणाले, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण– २०२० हे शैक्षणिक क्षेत्रात बहुआयामी बदल घडवून आणणारे आहे. या धोरणाच्या अंमलबजावणीसाठी शिक्षकांना प्रशिक्षण देवून भारतीय ज्ञान प्रणाली या अभ्यासक्रमात शिक्षक तज्ज्ञ बनविणे गरजेचे आहे. भारतीय ज्ञान प्रणाली या अभ्यासक्रमाची पद्धत शिक्षकांनी समजून घेतली पाहिजे.



**कोल्हापूर : कार्यशाळेत बोलताना डॉ. पी. एस. पाटील.**

संचालक डॉ. के. बी. पाटील, फलटण येथील मुधोजी कॉलेज मधील तत्त्वज्ञान विभागाचे विभाग प्रमुख डॉ. एन. के. रासकर, पलूस येथील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य आर. एस. साळुंखे तर स्कुल ऑफ नानो सायन्स आणि टेक्नोलॉजी येथील सहाय्यक प्राध्यापक पी. जे. पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. पाचगणी येथील बहाई अकादमीचे संचालक डॉ. एल. आझादी यांनी मुल्याधिष्ठीत शैक्षणिक अभ्यासक्रमावर ऑनलाईन सादरीकरण करून माहिती दिली.

डॉ. एम. एस. देशमुख यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन डॉ. नितीन रणदिवे यांनी केले. डॉ. सचिन भोसले यांनी आभार मानले. यावेळी डॉ. एम. एस. देशमुख, डॉ. एस. एच. ठकार, उपकुलसचिव व्ही. बी. शिंदे, आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

30 OCT 2024

पुढारी

# डॉ. मोहोळकर सलग पाचव्या वर्षी जागतिक शास्त्रज्ञांच्या यादीत

**कोल्हापूरः पुढारी वृत्तसेवा**



शिवाजी विद्यापीठाच्या पदार्थविज्ञान विभागाचे शास्त्रज्ञ डॉ. आण्णासाहेब मोहोळकर यांना अल्पेर-डोजर (एडी) सायंटिफिक इंडेक्सने ऑक्टोबर २०२४ मध्ये प्रसिद्ध केलेल्या टॉप जागतिक शास्त्रज्ञांच्या यादीत सलग पाचव्यांदा स्थान मिळाले आहे. त्यांच्या यशामुळे शिवाजी विद्यापीठाला आंतरराष्ट्रीय स्तरावर बहुमान प्राप्त झाला आहे. या सर्वेक्षणात ऊर्जा क्षेत्रात शिवाजी विद्यापीठात त्यांनी अव्वलस्थान पटकावले आहे.

संशोधन क्षेत्रात केलेल्या अतुलनीय कामगिरीबद्दल डॉ.

**• शिवाजी विद्यापीठाला मिळाला आंतरराष्ट्रीय बहुमान**

मोहोळकर यांना अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाले आहेत. नुकतेच अमेरिकेच्या स्टॅनफोर्ड विद्यापीठाने घेतलेल्या सर्वेक्षणात जागतिक क्रमवारीत टॉप २ टक्के शास्त्रज्ञांच्या यादीत पाचवे स्थान मिळाले आहे. डॉ. मोहोळकर यांनी मटेरियल सायन्स क्षेत्रात केलेल्या संशोधनाची दखल जागतिक स्तरावर घेण्यात आली आहे. डी. वाय. पाटील कृषी व तंत्र विद्यापीठाने त्यांना ॲडजंट प्रोफेसर म्हणून गौरविले आहे. सध्या ते सौर ऊर्जा, गॅस सेन्सिंग, सुपरकपॅसिटर, वॉटर स्प्लिटिंग, हैड्रोजन एनर्जी विषयांवर संशोधन करीत आहेत.

30 OCT 2024

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सर्वच मगरी धोकादायक नसतात...

## डॉ. मनोज बोरकर : शिवाजी विद्यापीठात वरुटे स्मृती व्याख्यानमाला

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २९ : पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी मगरींचे संवर्धन करणे गरजेचे आहे. सर्वच मगरी धोकादायक नसतात, त्यांचे अस्तित्व महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन कार्मेल कॉलेज फॉर वुमन गोवा येथील प्राणिशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. मनोज बोरकर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या प्राणिशास्त्र अधिविभागात आयोजित माजी कुलगुरू डॉ. आप्पासाहेब तानसेन वरूटे स्मृती व्याख्यानमालेत १६ वे पुष्प गुंफताना ते बोलत होते.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात प्राणिशास्त्र अधिविभागातर्फे आयोजित व्याख्यानात बोलताना डॉ. मनोज बोरकर.

अध्यक्षस्थानी विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. सरिता ठकार होत्या. डॉ. बोरकर यांनी भारतात आढळणाऱ्या मगरींच्या विविध प्रजाती, त्यांचे अधिवास, त्यांची वर्तणूक याबद्दल सविस्तर माहिती दिली. माणसावर मगरी नेहमी हल्ला करत नाहीत. माणसावर हल्ला करणाऱ्या मगरींच्या प्रजाती त्यांनी सांगितल्या. मगरींचा अधिवास हळूहळू नष्ट होण्याची कारणे त्यांनी सांगितली. पुराणामध्ये मगरींचा उल्लेख असल्याचे सांगताना त्यांनी मगरींचे पर्यावरणातील महत्त्व अधोरेखित केले. मगर आणि इतर प्राण्यांचा संवर्धनासाठी आणखी प्रयत्न करणे खूप गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी डॉ. ए. ए. देशमुख, एन. ए. कांबळे, एम. पी. भिलावे, ए. डी. गोफणे, आदी उपस्थित होते. व्याख्यानमालेचे समन्वयक डॉ. एस. एम. गायकवाड यांनी प्रास्ताविक केले. विभागप्रमुख डॉ. एस. आर. यंकंची यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. डॉ. एम. व्ही. वाळवेकर यांनी आभार मानले.